असा. क्र. १८५ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, जुलै २२, २००४/आषाढ ३१, शके १९२६

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-ब

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ जुलै २००४

अधिसूचना

हाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४.

क्रमांक युएसजी. १००४/(९४/२००४)/विशि-१.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र विद्यापीठ धिनियम, १९९४ (१९९४ चा महा. ३५) (यात यापुढे ज्याचा निदेश " उक्त अधिनियम " असा करण्यात ला आहे) याच्या कलम ३, पोट-कलम (२) अन्वये एक अधिसूचना काढून सोलापूर जिल्ह्यात अंतर्भूत सलेल्या क्षेत्रासाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर याच्या क्षेत्रातून उक्त क्षेत्र वगळून, सोलापूर द्यापीठ नावाचे एक नवीन विद्यापीठ स्थापन करण्याचे ठरविले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३, पोट-कलम (२) च्या परंतुकाद्वारे केलेल्या रतुदींनुसार, राज्य विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहांनी दिनांक ८ जून २००४ रोजी झालेल्या त्यांच्या बैठकींमध्ये, सोलापूर जिल्ह्यात अंतर्भूत असलेल्या क्षेत्रासाठी "सोलापूर विद्यापीठ " नावाने एक नवीन विद्यापीठ स्थापन करण्यासाठी आवश्यक ते ठराव संमत केले आहेत.



भाग-४-ब-२१८
[किंमत : रुपये ३.००]

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ (१९९४ चा महा. ३५) याच्या कलम ३, पोट-कलम (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, दिनांक २२ जुलै २००४ पासून सोलापूर जिल्ह्यांत अंतर्भूत असलेल्या क्षेत्रासाठी " सोलापूर विद्यापीठ " नावाने एक नवीन विद्यापीठ स्थापन करीत आहे आणि या प्रयोजनासाठी उक्त अधिनियमाला जोडलेल्या अनुसूचीमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे, ती अशी :—

उक्त अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची मध्ये,—

(क) भाग एक मधील, शिवाजी विद्यापीठाशी संबंधित नोंद ३ समोरील स्तंभ (३) मधील " (४) सोलापूर " हा मजकूर वगळण्यात येईल,

(ख) भाग दोन मधील, नोंद १ नंतर पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईल, ती अशी :—

" २. सोलापूर विद्यापीठ सोलापूर जिल्हा. ".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

चंद्रा अय्यंगार,
शासनाचे प्रधान सचिव.

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ जुलै २००४

### अधिसूचना

**महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४.**

क्रमांक युएसजी. १००४/(९४/२००४)/युएनआय-१.—महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ (१९९४ चा महा. ३५) याच्या कलम ११२ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन याद्वारे, डॉ. इरेश सदाशिव स्वामी, (रहाणार विद्या १२, ब्रह्मचैतन्य हौ. सोसायटी, नवीन आर.टी.ओ. ऑफिसजवळ, विजापूर रोड, सोलापूर) यांची, सोलापूर विद्यापीठाचे पहिले कुलगुरु म्हणून, ते कुलगुरू पदाचा पदभार स्वीकारतील त्या दिनांकापासून पाच वर्षांच्या अवधीसाठी किंवा त्यांच्या वयाची ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंतच्या अवधीसाठी यापैकी जो अवधी अगोदर पूर्ण होईल तोवर, नियुक्ती करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

चंद्रा अय्यंगार,
शासनाचे प्रधान सचिव.

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ जुलै २००४

### आदेश

**महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४.**

क्रमांक युएसजी. १००४/(९४/२००४)/विशि-१.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने,महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ (१९९४ चा महा. ३५) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ११२ चे खंड (सी), (डी), (इ), (जी), (एच), (आय) आणि (जे) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे, पुढील निदेश देत आहे :—

(एक) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी केलेले परिनियम, अध्यादेश, विनियम आणि नियम यांचे, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याकडून उक्त अधिनियमाखालील अधिकारांचा वापर करून अधिक्रमण करण्यात येईपर्यंत किंवा त्यात फेरबदल करण्यात येईपर्यंत, ते अंमलात असणे चालू राहील आणि ते, उक्त अधिनियमान्वये सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याकडून करण्यात आल्याचे मानण्यात येईल ;

(दोन) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर हे, सोलापूर जिल्ह्यातील आपल्या नोंदणीकृत पदवीधारकांची, शिवाजी विद्यापीठाचे नोंदणीकृत पदवीधर म्हणून कायम राहण्याची किंवा सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याकडे नोंदणी करून घेण्याची इच्छा आहे किंवा कसे याबाबतचा विकल्प त्यांच्याकडून मागवून घेईल ;

(तीन) नोंदणीकृत पदवीधर, त्यांच्या विकल्पासंबंधीची कागदपत्रे, कुल सचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे दिनांक ३१ डिसेंबर २००४ रोजी किंवा त्यापूर्वी सादर करतील. शिवाजी विद्यापीठ, विकल्पविषयक कागदपत्रांची विल्हेवाट करील आणि सोलापूर विद्यापीठाकडे नोंदणी करण्याचा विकल्प देणाऱ्या नोंदणीकृत पदवीधरांची विकल्पविषयक कागदपत्रे सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याकडे पाठवील ;

(चार) विनिर्दिष्ट कालावधीत जे नोंदणीकृत पदवीधर त्यांचा विकल्प देणार नाहीत ते, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे नोंदणीकृत पदवीधर राहतील ;

(पाच) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या अधिसभा, व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद आणि इतर प्राधिकरणे, मंडळे व समित्या यांमधील सोलापूर जिल्ह्यातील व्यक्तींचे सदस्यत्व हे, उक्त अधिनियमाच्या तरतुदींनुसार, यथास्थिती, अशी प्राधिकरणे, मंडळे व समित्या, इत्यादी, जोवर पुनर्घटित करण्यात येत नाहीत तोवर, तसेच चालू राहील ;

(सहा) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांस पूर्वी संलग्न असलेली, सोलापूर जिल्ह्यातील महाविद्यालये, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याकडे संलग्न होतील आणि परिणामी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडील अशा महाविद्यालयांचे संलग्नीकरण खंडीत होईल ;

(सात) शिवाजी विद्यापीठाच्या सोलापूर येथील पदव्युत्तर विद्यापीठ उपकेंद्रात शिक्षकांची २१ (एकवीस) पदे आणि ४१ (एकेचाळीस) शिक्षकेतर पदे नव्याने स्थापन झालेल्या सोलापूर विद्यापीठ, सोलापूर याकडे दिनांक १ ऑगस्ट २००४ पासून हस्तांतरीत होतील व नवीन विद्यापीठाच्या पदाचा भाग बनतील आणि परिणामी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर मधून तितक्याच संख्येत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवर्गाची पदे कमी होतील आणि अशा कर्मचाऱ्यांना लागू असणाऱ्या अटी व शर्ती या, नवीन विद्यापीठात त्यांचे हस्तांतरण होण्याच्या लगतपूर्वी त्यांना ज्या शर्ती लागू होत्या, त्याच शर्ती लागू होतील ;

(आठ) शिवाजी विद्यापीठाच्या सोलापूर येथील पदव्युत्तर विद्यापीठ उपकेंद्राची मत्ता, जसे की जंगम अथवा स्थावर मालमत्ता, अधिकार, संपादित केलेले असे कोणत्याही प्रकारचे हितसंबंध आणि दिनांक १ ऑगस्ट २००४ पूर्वी पत्करलेली दायित्वे व बंधने सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याकडे हस्तांतरीत होतील ;

(नऊ) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांची मान्यता असलेली सोलापूर जिल्ह्यातील मान्यताप्राप्त संस्थांची मान्यता काढून घेण्यात येईल आणि त्या संस्था सोलापूर विद्यापीठ, सोलापूर याद्वारे मान्यताप्राप्त असल्याचे समजण्यात येईल ;

(दहा) कलमे ८१ ते ९२ (यांत दोन्हीही अंतर्भूत) यांखाली सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांशी संबंधित सर्व प्रकरणे सोलापूर विद्यापीठाकडे हस्तांतरीत करण्यात आल्याचे समजण्यात येईल ;

(अकरा) सोलापूर जिल्ह्यातील ज्या विद्यार्थ्यांनी पदवीपूर्व परीक्षेस बसण्यासाठी नावे नोंदविली आहेत आणि जे त्यांसाठी पात्र आहेत ते शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे विद्यार्थी असल्याचे चालू राहील आणि ते उक्त विद्यापीठाने घेतलेल्या यथास्थिती, प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्ष पदवी परीक्षेस बसण्यास पात्र असतील आणि ते त्यांचा पदवी अभ्यासक्रम पूर्ण करीपर्यंत शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी असल्याचे चालू राहील ;

(बारा) ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २००४-२००५ पासून पुढे सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांमध्ये प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमाकरीता नाव नोंदविले असेल, ते सोलापूर विद्यापीठाचे विद्यार्थी असतील व त्यांच्या परीक्षा मार्च, २००५ पासून पुढे त्या विद्यापीठाकडून घेतल्या जातील ;

(तेरा) कोल्हापूर येथील विद्यमान महाविद्यालय न्यायाधिकरण हे, तसेच कार्यरत राहील आणि सोलापूर विद्यापीठाकरिता विद्यापीठ व महाविद्यालयीन न्यायाधिकरण घटीत करण्यात येईपर्यंत, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या अधिकारितेतील महाविद्यालयांच्या शिक्षकांची व कर्मचारीवर्गाची प्रकरणे हाताळील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

चंद्रा अय्यंगार,
शासनाचे प्रधान सचिव.

**HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT**
Mantralaya Annexe, Mumbai 400 032, dated the 22nd July 2004

*NOTIFICATION*

MAHARASHTRA UNIVERSITIES ACT, 1994.

No. USG. 1004/(94/2004)/UNI.-1—Whereas, the Government of Maharashtra has decided to constitute, by issuing a notification under sub-section (2) of section 3 of the Maharashtra Universities Act, 1994 (Mah. XXXV of 1994) (hereinafter referred to as "the said Act"), a new University by the name "The Solapur University", for the area comprising the district of Solapur by excluding the said area from the area of the Shivaji University, Kolhapur.

And whereas, as provided by the proviso to sub-section (2) of section 3 of the said Act, the requisite Resolutions have been passed by both Houses of the State Legislature for constituting a new University by the name "The Solapur University", for the area comprising the district of Solapur in their meetings, held on the 8th June 2004 ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (2) of section 3 of the Maharashtra Universities Act, 1994 (Mah. XXXV of 1994), the Government of Maharashtra hereby, with effect from the 22nd July 2004, constitutes a new University by the name "The Solapur University" for the area comprising the district of Solapur and for the purpose amends the Schedule appended to the said Act, as follows, namely :—

In the Schedule appended to the said Act,—

(*a*) in Part I, against entry 3, relating to the Shivaji University, in column (3), the bracket, figure and word "(4) Solapur" shall be deleted ;

(*b*) in Part II, after entry 1, the following entry shall be added, namely :—

"2. The Solapur University — District of Solapur".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

CHANDRA IYENGAR,
Principal Secretary to Government.

**HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT**
Mantralaya Annexe, Mumbai 400 032, dated the 22nd July 2004

*NOTIFICATION*

MAHARASHTRA UNIVERSITIES ACT, 1994.

No. USG. 1004/(94/2004)/UNI.-1—In exercise of the powers conferred by clause (*a*) of section 112 of the Maharashtra Universities, Act, 1994 (Mah. XXXV of 1994), the Government of Maharashtra hereby appoints Dr. Iresh Sadashiv Swami (' Vidya ', 12, Bramchaitanya Housing Society, Near New R.T.O., Bijapur Road, Solapur) as the first Vice-Chancellor of the Solapur University for a term of five years or till he attains the age of sixty-five years, whichever is earlier, with effect from the date he takes over the charge of the office of the Vice-Chancellor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

CHANDRA IYENGAR,
Principal Secretary to Government.

## HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Mantralaya Annexe, Mumbai 400 032, dated the 22nd July 2004

### Order

MAHARASHTRA UNIVERSITIES ACT, 1994.

No. USG. 1004/(94/2004)/UNI.-1—In exercise of the powers conferred by clauses (*c*), (*d*), (*e*), (*g*), (*h*), (*i*) and (*j*), of section 112 of the Maharashtra Universities Act, 1994 (Mah. XXXV of 1994) (hereinafter referred to as " the said Act "), the Government of Maharashtra hereby directs that the,—

(*i*) Statutes, Ordinances, Regulations and Rules made by the Shivaji University, Kolhapur, shall, continue in force and deemed to have been made under the said Act by the Solapur University, Solapur, until they are superseded or modified by exercising the powers under the said Act by the Solapur University, Solapur ;

(*ii*) Shivaji University, Kolhapur, shall obtain the opinion from its registered graduates from the district of Solapur, whether they wish to continue to remain registered graduates of the Shivaji University or to get registered with the Solapur University, Solapur ;

(*iii*) registered graduates shall submit their option papers to the Registrar, Shivaji University, Kolhapur, on or before the 31st December 2004. The Shivaji University shall sort it out and forward the option papers of the registered graduates opting to register themselves with the Solapur University to the Solapur University, Solapur ;

(*iv*) registered graduates who do not give their option within the stipulated period, shall continue to remain the registered graduates of the Shivaji University, Kolhapur ;

(*v*) memberships of the persons of the Senate, Management Council, Academic Council and other authorities, bodies and committees of the Shivaji University, Kolhapur, from the district of Solapur, shall continue as such till such authorities, bodies and committees, etc., as the case may be, are reconstituted as per the provisions of the said Act ;

(*vi*) colleges in the district of Solapur, previously affiliated to the Shivaji University, Kolhpaur, shall stand affiliated to the Solapur University, Solapur and consequently the affiliation of such colleges with the Shivaji University, Kolhapur, shall stand discontinued ;

(*vii*) transfer, with effect from the 1st August 2004 ; twenty-one employees holding the posts of teachers, and forty-one employees holding the posts of non-teaching in the post-graduate University sub-centre at Solapur of the Shivaji University to the newly constituted Solapur University, Solapur, and shall form part of the posts of the new University and consequently an equivalent number of posts of teaching and non-teaching staff stands reduced from the Shivaji University, Kolhapur, and the terms and conditions applicable to such employees shall be the same as were applicable to them immediately before their transfer to the new University ;

(*viii*) assets of the post-graduate university sub-centre at Solapur of the Shivaji University, that is to say, property either movable or immovable, rights, interests of whatsoever kind acquired and the liabilities and obligations incurred before the 1st August 2004, shall stand transferred to the Solapur University, Solapur ;

(*ix*) institutions situated in the Solapur district recognised by the Shivaji University, Kolhapur, shall stand derecognised and the same shall stand recognised by the Solapur University, Solapur ;

(*x*) matters pertaining to the colleges affiliated to the Solapur University, Solapur, under sections 81 to 92 (both inclusive), shall stand transferred to the Solapur University, Solapur ;

(*xi*) students enrolled and eligible for appearing at the under-graduate degree examinations in the Solapur district, shall continue to be the students of the Shivaji University, Kolhapur and shall be eligible for appearing at Ist year, IInd year and IIIrd year degree examinations, as the case may be, conducted by the Shivaji University and they shall continue to be the students of the Shivaji University till they complete their graduation course ;

(*xii*) students enrolled in 1st year degree course in colleges affiliated to the Solapur University, Solapur, from the academic year 2004-2005, onwards shall be the students of the Solapur University, which shall conduct the examinations for them from March 2006 onwards ;

(*xiii*) existing College Tribunal at Kolhapur, shall continue to function as such and handle cases of the teachers and employees of the colleges under the jurisdiction of the Solapur University, Solapur, till the constitution of University and College Tribunal for Solapur University.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

CHANDRA IYENGAR,
Principal Secretary to Government.